# राशिभविष्य - एप्रिल, २०२३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत रवि -गुरु-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे शारीरिक,मानसिक अनारोग्य होणे संभवते. तसेच त्याच्यामुळे हितशत्रूंचा त्रास होणे, मानभंग होणेही संभवते. गुरूमुळे अध्यात्म व सामाजिक कार्यात कार्यरत असणारांना प्रगती करणे शक्य होईल. नेपच्यूनमुळे चिंता व मानसिक व्यग्रता त्रस्त करतील. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत बुध -राहू-हर्षल असे तीन ग्रह असून येथील बुध व राहू प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, अपमान, मित्रद्रोह, धननाश होणे संभवते. त्याशिवाय मनस्थिती चंचल होणे, कुसंगतीची बाधा होणेही संभवते. जपा. हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा घडेल. कोणाचा धाक वा दडपण सहन होणार नाही. या राशीची लहान मुले तर हूड, खट्याळ व खोडकर होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी वृषभ या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे स्त्रीसुख व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, , धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे हिंमत, धैर्य, महत्वाकांक्षा वाढेल, पण त्याच्यामुळे इजा होणेही संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर होईल, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा पडेल व हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो साधारणपणे अनुकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक प्रगती होणेही संभवते. पण संततीपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून

श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा. गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत शुक्र असून त्याच्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत मंगळ असून तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून तो सर्व प्रकारे अनुकुल होईल व त्याच्यामुळे मनस्थिती उदार होईल,, आचारविचार उच्च होतील, आरोग्य उत्तम राहील व नोकरी-व्यवसायात सहकार्य लाभेल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो कोळसा, लोखंड, पोलाद यांचा व्यापार-व्यवसाय असणारांना अनुकुल प्रगतिकारक व लाभदायक होईल. इतरांना साधारण सुखदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत रवि, गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या शासकीय सेवेत असणारांपैकी काहींना बढती, पगारवाढ, क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान मिळणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, धनलाभ होणे संभवते. तसेच या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येईल, नवे मित्र मिळतील व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या व्ययस्थानी बुध, राहू ,हर्षल असे तीन ग्रह असून राहूमुळे आचरण दिखाऊ प्रकारचे होईल; पण त्याच्यामुळे अर्थलाभ होणेही संभवते. बुध पूर्णपणे प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, मानहानी होणे, अनारोग्य होणे संभवते. हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच वाईट प्रसंगाला सामोरे जावे लागण्याची शक्यता दिसते. शिवाय तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. श्रद्धा असेल तर श्री शिवशंकराची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे

त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत मंगळ असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, मानापमान फार होतील, शरीरपीडा, श्रम, दगदगही फार होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना तो प्रतिकुलच होईल. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील, शिवाय या राशीच्या मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो तत्वज्ञान, वकिली सारखे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत रवि, गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, प्रगतिकारक व सर्व प्रकारे लाभदायकच होईल. येथील गुरु बौद्धिक व शास्त्रीय सांशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच येथील नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत बुध , राहू, हर्षल असे तीन ग्रह असून येथील बुधामुळे धनलाभ, मित्रलाभ व सुखसमाधान प्राप्त होईल. राहूमुळे ज्यांच्या हाती अधिकार आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह त्रस्त करील. जपा. अशा परिस्थितीत मनावर ताबा ठेवून योग्य ते आचरण करा. तेच सुखाचे होईल. तसेच जुगाराचा नाद असणारांनीही जुगाराच्या नादी लागून स्वतः:चे नुकसान करून घेऊ नये. येथील हर्षलमुळे सर्व काही अनिश्चित तेच घडेल. पण बुधाशी संबंध असल्यामुळे अर्थलाभ होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी स्वराशीत शुक्र असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर शिव शंकराची व दुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे आणि “दुर्गादेवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:”

तारक मंत्राचा , ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः: शंकराय” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारकही असल्यामुळे खाण्यापिण्यात जपावे लागेल. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो दु:ख, दैन्यकारक आहे. त्याच्यामुळे एखादा विचित्र आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शिवाय तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत रवि, गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल व त्याच्यामुळे मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध, कसली तरी भीती अस्वस्थ करील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या शासकीय नोकरदार मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. खाजगी नोकरीत असणारांनाही तो अनुकुलच होईल. येथील बुधही मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान देईल. येथील राहूही अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना अधिकारपद मिळू शकेल. क्वचित कोणाचा सन्मानही होईल. या स्थानी असलेला हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत शुक्र असून तो सर्व प्रकारे सुखदायकच होईल. त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. तसेच त्याच्यामुळे मन:शांतीही लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत मंगळ असून तो पूर्णपणे प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे काही जुनी प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांच्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. गैरसमजामुळे वाद, भांडणे होतील. जपा. आर्थिक नुकसान होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे मानसिक दु:ख सहन करावे लागेल. म्हणून त्यांनी मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासना करावी. पण या राशीच्या ज्या मंडळींचा व्यापार व्यवसाय आहे अशांना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ या स्वतः:च्या राशीत शनि असून त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. पण त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील. या राशीच्या अष्टमस्थानी मीन राशीत रवि,गुरु,नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत

तो संपूर्ण महिन्याच्या  काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, अनारोग्य, हाती घेतलेल्या कार्यात अपयश  येणे संभवते. संततिसुखात बाधा येईल. मानसिक ताण सहन करावा लाभेल व वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. या राशीच्या अष्टम स्थानी स्वराशीत असलेल्या गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही  मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. येथील नेपच्यून  जलभय-विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच खोल पाण्यात पोहू नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत बुध, , राहू, हर्षल असे तीन ग्रह असून बुधामुळे नियोजित कार्यात अडथळे निर्माण होणे, दिरंगाई होणे, वाद, भांडणे होणे संभवते.  राहूमुळे सभाधीटपणा येईल, हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगती करणे शक्य होईल. शिवाय काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे    योग येतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत शुक्र असून तो स्वराशीत असला तरी कलाक्षेत्रातील मंडळींना तो काही प्रमाणात अनुकुल होणे संभवते. पण अन्य व्यावसायिकांना तो प्रतिकुल व दु:खदायकच  होईल. या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत मंगळ  असून त्याच्यामुळे मैत्रीत वितुष्ट निर्माण होणे संभवते. तसेच कष्ट-परिश्रम केल्यासच अर्थलाभ होईल. पण या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीविष्णू ची उपासना मन:शांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने  “विष्णु सहस्रनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः:”  तारक मंत्राचा,  ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी  तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे शत्रुत्व निर्माण होईल. अनारोग्य होईल, गैरसमजुतीने वाद, भांडणे होतील. पण तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन  राशीत रवि, गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह  असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मेष  राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो पूर्वार्धात केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणे संभवते. पण त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, नियोजित कार्यात अपयश, येणे, इच्छा आकांक्षा अपूर्ण राहणे संभवते. तसेच संततिसुखात बाधा येईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरुमुळे काहींचे प्रेमसंबंध जुळून येतील, विवाहेच्छूना विवाहयोग येईल, नवे स्नेहसंबंध निर्माण होतील, अर्थलाभ होईल व प्रवासयोग येतील. नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे

संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत बुध, राहू, हर्षल असे तीन ग्रह असून बुधामुळे कार्यसिद्धी होईल व यश प्राप्त होईल. सुखसमाधान लाभेल. हर्षलमुळे अनारोग्य होणे संभवते. तसेच राहूमुळे मनात कपटी विचार येतील. जपा. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत शुक्र असून त्याच्यामुळे गुरुकृपा, थोरकृपा, सुसंगती प्राप्त होईल. काही मंडळींना प्रसिद्धी मिळेल आणि सुखसमाधान लाभेल. या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे या राशीच्या काही व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना कामाचा असह्य ताण सहन करावा लागेल. त्यामुळे काही मंडळींना . हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. आहे ती नोकरीच करावी. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मन:शांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी " ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो अनुकुल व सुखकारकच होईल. पण तो वाहनधोकादायक असल्यामुळे सतत सावधानतेने मार्गक्रमण करावे लागेल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे स्वभाव स्वार्थी, संशयी, व्यवहारी असा घडणे संभवते. पण तो चिकाटीचा गुण व चिकित्सक बुद्धी देणारा आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गुरु, रवि, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल, दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो केंद्रस्थानी जात असल्यानेच भाग्योदयकारक होऊ शकेल. गुरुमुळे आरोग्य सुधारेल व सुख लाभेल. नेपच्यूनमुळे उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. शिवाय फसवणूक झाल्यास मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी बुध, हर्षल, राहू असे तीन ग्रह आहेतच. पैकी बुधामुळे भांडणे होतील व दु:ख, मनस्ताप सहन करावा लागेल. राहूमुळे मनात कपटी विचार प्रबळ होतील. शिवाय वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होईल. जपा. तसेच हर्षलमुळे सुद्धा स्वाभाविक दोष, मतभेद, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी काहीही कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या

राशीच्या अष्टम स्थानी वृषभ  राशीत  शुक्र असून  त्याच्यामुळे कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. पण हा शुक्र वृद्ध  मंडळींना प्रतिकुल  होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत मंगळ असल्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मानहानी, मनस्ताप होणे संभवते.  श्रद्धा असेल तर  शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मन:शांती देईल.  त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्राद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे  पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा.  त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र  चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे  नमः:” तारक  मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र  स्वाती आहे  त्यांनी “ओम  वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र  विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:”  तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -**  या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून  तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे गृहसौख्यात  बाधा निर्माण होणे संभवते. त्यामुळे  दु:ख व नैराश्य  येणे संभवते.   या राशीच्या पंचम स्थानी मीन  राशीत  रवि, गुरु, नेपच्यून असे  तीन  ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात, संततिसुखात बाधा, नोकरीत वरिष्ठांचा जाच, नातेसंबंधात दुरावा अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो  अनुकुल होईल व  दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील व मन:शांती लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी  स्वराशीत असलेल्या गुरुमुळे सर्व प्रकारे सुखसमाधान प्राप्त होईल. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील, अर्थलाभ होईल व  या राशीच्या  विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करता येईल.  येथील नेपच्यूनमुळे  मनस्थिती अति भावनाशील होईल. पण तो अध्यात्मिक  उपासना   व गूढ  संशोधन  यांत रस असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल.  या राशीच्या षष्ठ स्थानी  मेष राशीत बुध, राहू, हर्षल असे तीन ग्रह आहेतच.पैकी बुधामुळे कार्यसिद्धी होईल व  त्यातून अर्थलाभ व  कीर्ती-प्रसिद्धीही मिळू शकेल.  राहूमुळे ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते.  येथील हर्षल  डोकेदुखी  देणारा असल्यामुळे या राशीच्या सतत सखोल विचार करण्याची सवय असणारांनी मेंदूवर ताण पडेल इतका विचार करू नये. नपेक्षा असह्य डोकेदुखी वा मेंदूविकार निर्माण होतील. जपा.  या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ या स्वराशीत  शुक्र असून  त्याच्यामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह संपन्न होतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल.  या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत

मंगळ असून  तो प्रतिकुलच होईल. त्याच्यामुळे उष्णताविकार बळावतील, हाडमोड होणेही संभवते. जपा. त्याशिवाय तो जलभयकारक व वीजभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहू नका. तसेच विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा.. या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी  “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्याचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्याने जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळेल तर काही मंडळींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत रवि ,गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, दु:ख, आर्थिक चिंता, अपघात भय, नातेसंबंधात दुरावा येणे, संततीपैकी कोणाच्या आजाराची चिंता निर्माण होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. पण चतुर्थ स्थानी असलेल्या गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. तरीही एखाद्या नातेसंबंधातील व्यक्तीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. पण काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. येथील नेपच्यूनमुळे घरगुती संबंधात वाद, भांडणे होण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत बुध, राहू, हर्षल असे तीन ग्रह आहेतच. पैकी बुधामुळे बुद्धी मंद होईल, संतती व स्त्रीपासून त्रास होईल. राहूमुळे संततिसुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ या स्वराशीत शुक्र असून तो कलाक्षेत्रातील मंडळींना अनुकुल असला तरी कलेत उच्च गुण असूनही ते प्रदर्शित करण्यास संधीच मिळणार नाही. या शुक्रामध्ये शुद्ध प्रेमभावना नसून कामुकता असल्यामुळे नसते आळ येणे, व्यसनाधीन होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे जीवनसाथीचे अनारोग्य, वैवाहिक जीवनातील कटकटी अशापैकी कारणांनी वैवाहिक सुखसमाधान लाभणे

कठीण होणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी गैरसमज, वाद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकूल होईल व त्याच्यामुळे यशधनलाभ होईल, प्रवासयोग येतील व सुखोपभोग प्राप्त होईल. श्रद्धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्याचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नम:' तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या धनस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच आर्थिक समस्याही निर्माण होण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत रवि, गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर प्रभावित होतील, क्वचित कोणाचा सन्मान होईल तर कोणास एखादे उच्च पदही मिळू शकेल. धनलाभ होणेही संभवते. सर्व सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास, कार्य दिरंगाई, दु:ख, निराशा, आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या तृतीय स्थानी स्वराशीत असलेला गुरु या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल व यशदायक होईल. प्रवासाचे योग येतील; पण भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण ज्यांना अध्यात्मात रस आहे त्यांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. गूढ संशोधनाची आवड असणारांनाही तो त्यांच्या संशोधन कार्यात यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत बुध, राहू, हर्षल असे तीन ग्रह आहेतच. पैकी बुधामुळे गृहसौख्य मिळेल, मित्रलाभ होईल; पण आर्थिक नुकसान होणे संभवते. जपा. राहूमुळे कौटुंबिक त्रास,अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे संभवते. तसेच हर्षलमुळेही घरात कोणाशी पटणार नाही, कशातही सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल व वास्तुसुख लाभणार नाही. जपा. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ या स्वराशीत शुक्र असून तो सर्व प्रकारच्या कला क्षेत्रातील मंडळींना व कलेची आवड असणारांना अनुकुल व आनंददायक होईल.पण त्याच्या कलेला प्रसिद्धी मिळणे संभवत नाही. या

राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत मंगळ असून तो वैद्यकीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इजा होणे संभवते. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. तसेच चोरी होणे,आर्थिक हानी होणे संभवते. जपा. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून व संयम राखून तसे करण्याचा विचारही करू नये. आहे त्या स्थितीतच सुखासमाधानाने राहावे. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकरा”ची व “श्रीहनुमाना”ची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई निर्माण होईल. तसेच कुटुंबातील काही प्रिय व्यक्तींचे दूरत्व निर्माण झाल्यास गहरे नैराश्य येईल. पण काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या द्वितीय स्थानी मीन राशीत रवि, गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शिवाय विविध प्रकारे आर्थिक समस्याही त्रस्त करतीलसे दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कार्यकुशलतेवर प्रसन्न होतील, आर्थिक लाभ होतील, व क्वचित कोणाचा सन्मान केला जाईल तर कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरुमुळे अर्थलाभ होईल व कुटुंबात शुभ घटना घडतील. येथील नेपच्यूनमुळेही आर्थिक संकटे येणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत बुध, राहू व हर्षल असे तीन ग्रह असून येथील बुधामुळे शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता दिसते. तसेच शत्रुभय असून क्वचित कोणास राजद्रोहाच्या संकटाशी मुकाबला करावा लागण्याची शक्यताही दिसते. येथील राहूमुळे हातून कर्तृत्व व पराक्रम घडेल आणि मनस्थिती विशाल होऊन उत्साह वाढेल. येथील हर्षलमुळे उच्च बौद्धिक शक्ती, स्मरणशक्ती व आकलनशक्ती प्राप्त होईल. त्यामुळे काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ या स्वराशीत शुक्र असून त्याच्यामुळे ऐषाराम व

सुखसमाधान लाभेलच.त्याशिवाय त्याच्यामुळे शेतीवाडी असणारांनाही त्यापासून लाभ होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत मंगळ असून तो वैद्यकीय शिक्षण घेत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे नोकरदार मंडळींना वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. तसेच संततीपैकी कोणाच्या आजारामुळे किंवा मनाविरुद्ध आचरणामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे दिखाऊ आचरण होणे संभवते. तसेच संततिसुखात बाधा येणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने :"शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा:चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नम: " तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि,गुरु, नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, थकवा, मनस्ताप, आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. येथील गुरु शुभ असून त्याच्यामुळे प्रकृती उत्तम राहील व संशोधन व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तसेच लेखकांना तो अनुकुल व यशदायक होईल. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अति कोमल होईल व संवेदना अति जलद होतील. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत बुध , राहू व हर्षल असे तीन ग्रह असून येथील बुध दु:खदायक होणार असला तरी धनदायक होईल. राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होईल व आर्थिक चिंता त्रस्त करतील. जपा.येथील हर्षलमुळे स्वभाव अस्थिर,चंचल, लहरी असा घडेल. कोणाचाही धाक वा दडपण सहन होणार नाही. पण तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत शुक्र असून त्याच्यामुळे काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा तर सर्वांना धनलाभ होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कुटुंबात अशुभ व असमाधानकारक घटना घडतील. गैरसमजाने कुटुंबात वाद, भांडणे होतील व कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना त्वचारोगाचा तर काहींना रक्तविकाराचा त्रास सहन करावा लागेल. कौटुंबिक कलहामुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होईल. जपा. तसेच येथील केतू अपघातकारक

असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत शनि असून तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे संकटपरंपराच निर्माण होतील. म्हणून सर्व आर्थिक व्यवहार जपून व सावधानतेनेच करा. मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====∘∘∘∘∘0∘∘∘∘∘∘=====